"दुष्टांच्या दुष्कृत्यामुळे नाही तर सज्जनांच्या निष्क्रियतेमुळे समाज बिघडतो"
स्वयंसिद्धा महिला मंडळ, लातूर
SWAYAMSIDDHA MAHILA MANDAL
H.O. : Vishva sadan, Vivekanadpuram, Latur - 413512
S.H.: P 69, MIDC, Latur - 413512 (Maharashtra)
Mob. 8390906712/40, 8390906715/19/20/23/11/24
Email : smparchure24@gmail.com
hgdixit1971@gmail.com
URL : www.swayamsiddha.in

Coop. Society Regn. No. Maha/6120/Latur dated 15.02.1996 Public Trust Regn. No. F 5749(Latur) dated 02.07.1998 NITI Aayog - Darpan Regn. No. MH/2016/0101097
SSI Regn. No. MH16B0004742 dtd.01.09.2018 SBI Bank Ac : Cur.ac no.30140917716 IFSC:SBIN0006756 PAN No. : AABTS9369M

स्वयंसिध्दा महिला मंडळ लातूरद्वारा संचलित

कुटुंब सल्ला केंद्र, औसा ता. औसा जि. लातूर

# यशस्वी केस तपशील

श्री विक्रम यांचा विवाह हिंदु रिती रिवाजाप्रमाणे सौ शिवकर्णा यांच्या सोबत दि. ०५/०४/२०१० या वर्षात झाला. लग्ना नंतर शिवकर्णा ही आपल्या पती व सासू सास-या सोबत व्यवस्थीत राहत होती. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना मुलगा व मुलगी अशी दोन अपत्यं झाली.

शिवकर्णा ही सतत आपल्या पती सोबत छोटया छोटया कारणावरून भांडण करत असल्याने तीच्या सासु सास-याने तिला वेगळीकडे ठेवलं होतं. तसेच त्यांच्या जमिनीची वाटणी करून शिवकर्णा हीला दिली. तरी पण ती सतत कोणत्याही कारणावरून भांडण करत असल्याने, तसेच मी मरते अशी धमकी देत असे.

त्या कारणावरून श्री विक्रम जाधव यांनी दि.०३/०७/२०१७ रोजी त्यांच्या पत्नी विरोधात केस दाखल केली त्यानंतर दि.१३/०७/२०१७ रोजी या दोघांची बैठक घेण्यात आली. त्या दिवशी श्री नितिन इरकट्टे व सौ भाग्यश्री स्वामी या दोन समुपदेशक यांनी त्या दोघांना व्यवस्थीत समुपदेशन केले. त्यांना समजुन घेवून व्यवस्थित सांगण्याचा प्रयत्न केला. या कारणावरून शिवकर्णा हिला खुप वेळा संस्थेनी समजावून सांगितले तसेच दोघामध्ये असणा-या उणिवा या संस्थेनी भरून काढण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर परत काही दिवसानी आम्ही त्या दोघांची दुसरी बैठक दि.१८/०७/२०१७ रोजी घेण्यात आली. त्यामध्ये मागील समुपदेशनाचा चांगला परिणाम झालेला आम्हाला दिसूण आलं. पहिल्या बैठकीत जी त्यांची बोलण्याची भाषा तसेच वाक्यप्रचार होते ते आता संपुर्णपणे बदललेले दिसले. शिवकर्णा हीच्या केस मध्ये खूप बदल झाल्या सारखा आम्हाला दिसून आला. व चांगल्या प्रकारे समुपदेशन करून दि.१८/०८/२०१७ रोजी तिला नांदायला पाठवले.

आज रोजी ते व्यवस्थीत सुखाने संसार करताना दिसत आहे. त्यांचा संसार पुन्हा मार्गी लागला असता हे पाहुण खुप समाधान वाटले.